72

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## सन १८६६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४

# एदलाबाद व वरणगाव परगणा विधी अधिनियम, १८६६

( १ जानेवारी, २०१५ पर्यंत सुधारित )

## Bombay Act No. XIV of 1866

# The Edulabad And Warangaon Parganas Laws Act, 1866

*( As modified upto 1st January, 2015 )*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र शासन, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१४

[ किंमत रु. ८.०० ]

# एदलाबाद व वरणगाव परगणा विधी अधिनियम, १८६६

अनुक्रमणिका


उद्देशिका. [निरसित]

| कलमे. | पृष्ठ |
| --- | --- |
| १. [निरसित] .. .. .. | १ |
| २. [निरसित] .. .. .. | १ |
| ३. विवक्षित पदाच्या व्यक्तींचे विशेषाधिकार व सूट. .. .. .. | १ |
| ४. [निरसित] .. .. .. | १ |


H-761

# सन १८६६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४[१]

[ एदलाबाद व वरणगाव परगणा विधी अधिनियम, १८६६]

[ ७ डिसेंबर, १८६६ ]

सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १० द्वारे टप्याटप्याने निरसित;
सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १२ द्वारे टप्याटप्याने निरसित;
सन १८९५ चा अधिनियम क्रमांक १६ द्वारे टप्याटप्याने निरसित.

एदलाबाद व वरणगाव परगणा यांना सर्वसाधारण विनियम व मुंबई इलाखा अधिनियम या अंतर्गत आणण्यासाठी अधिनियम.

**उद्देशिका** [सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १२ निरसित]

१. [विनियम व मुंबई इलाखा अधिनियम यांना एदलाबाद व वरणगाव यांची अधीनता] सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १२ निरसित.

२. [विवक्षित प्रकरणात दिवाणी न्यायालयाच्या अधिकारतेस प्रतिबंध] सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १० निरसित.

३. सन १८२७ चा विनियम २४, कलम ३, ४, व ५ (दख्खन आणि खांदेश मधील मुंबई राज्यक्षेत्र विनियमाच्या कार्यक्षेत्राखाली आणण्याकरिता विनियम), आणि

सन १८३० चा विनियम ७, कलम ५ (कंपनीच्या मालकीचे दक्षिण मराठा देशामध्ये समाविष्ट असलेले राज्यक्षेत्र आणि जिल्ह्यामध्ये रचना असलेले उक्त राज्यक्षेत्र विनियमाच्या कार्यक्षेत्राखाली आणण्याकरिता विनियम), आणि

विवक्षित पदाच्या व्यक्तींचे विशेषाधिकार व सूट

सन १८३१ चा विनियम १ (ज्या दाव्यांमध्ये विशेषाधिकार असलेल्या वर्गाच्या पदाच्या व्यक्ती संबंधित आहेत आणि ज्या जमीन महसुलाच्या मुख्य अधिकाऱ्याकडून दखलपात्र नाहीत अशा दाव्यांत १८२७ चा विनियम २९, कलम ४ च्या तरतुदीं अन्वये कार्यरत असणाऱ्या शासनाच्या प्रतिनिधीचे अधिकारक्षेत्र विस्तारित करण्यासाठी विनियम), आणि

सन १८३१ चा विनियम १६ (सन १८३१ चा विनियम १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरुपाचे दिवाणी दावे लावण्यासाठी आणि तसेच विशेषाधिकार असलेल्या वर्गाच्या व्यक्तींच्या संबंधात प्रदान केलेल्या त्यातील अधिकारितेचा विस्तार अधिक चांगल्या प्रकारे निश्चित करण्यासाठी सन १८३० चा विनियम ७, कलम ५ च्या तरतुदीं अन्वये दक्षिण मराठा देशामधील राजकीय प्रतिनिधीकडे निहित केलेले अधिकारक्षेत्र विस्तारित करण्यासाठी विनियम) [२] ****

यात तरतूद करण्यात आलेले विशेषाधिकार व सूट जिल्ह्यांमध्ये लागू असून आता त्यामध्ये निर्दिष्ट केलेल्या पदाच्या व्यक्तींसाठी ते जसे उर्वरित खानदेश व दख्खन मध्ये लागू आहेत त्याच प्रकारे लागू करण्यासाठी विनियमांखाली व अधिनियमांखाली आणण्यात येत आहेत.

४. [विधिग्राह्यीकरण व ओळख पटवणे] १८६६ चा १२ याद्वारे निरसित.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र (इंग्रजी) १८८६, पुरवणी, पृ. १४ पहा आणि परिषदेतील कामकाजविषयक वृत्तासाठी मुंबई शासन राजपत्र (इंग्रजी) १८८६, पृष्ठे ४३० व ४४३ पहा. संक्षिप्त नाव हे मुंबई संक्षिप्त नाव अधिनियम, १९२१ (१९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २) द्वारे देण्यात आले आहे.

२. हे शब्द व आकडे मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) अनुसूची ब द्वारे निरसित करण्यात आले. ही अनुसूची मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १) मध्ये परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.